# देशदूत

शिल्पकार विकासाचा...

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २८ । अंक ११३ । शुक्रवार, दि.१८ एप्रिल २०२५ । पाने-८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर



## भाजपाच्या मंत्र्यांचाही जनता दरबार

**मुंबई ।** शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या मंत्र्यांच्या पाठोपाठ आता भाजपने आपल्या मंत्र्यांचा जनता दरबार आयोजित केला आहे. त्यानुसार भाजपचा प्रत्येक मंत्री महिन्यातून एकदा प्रदेश भाजप कार्यालयात जनतेच्या भेटीसाठी उपलब्ध असणार आहेत. भाजप मंत्र्यांच्या पहिल्या जनता दरबाराची सुरुवात येत्या २२ एप्रिलपासून होईल. या दिवशी दुपारी तीन ते साडेचार यावेळेत पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे प्रदेश कार्यालयात उपस्थित राहून जनतेला भेटणार आहेत.



रु.55 प्रति किलो कालीमुछ चावल
रु.55 प्रति किलो बासमती चावल
रु.50 प्रति किलो चिनौर चावल
रु.80 प्रति किलो चना दाल
रु.105 प्रति किलो तुवर दाल
रु.3100 क्विंटल एम.पी का शरबती गेहुँ
हॉटेल,मेस,किराणा व घरगुतीसाठी घरपोच सुविधा व रिपलेसमेन्ट उपलब्ध
अवतार ट्रेडिंग कंपनी
एम-१०५,एम.आय.डी.सी., किरण पाईप के पिछे,जळगांव, मो.9850379271



गुड फ्रायडे!



# पहिलीपासून हिंदी; वादाची ठिणगी!



**मुंबई ।** केंद्राच्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करताना राज्यात इंग्रजीसोबतच मराठी माध्यमाच्या शाळेत इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा हा विषय अनिवार्य करण्याच्या निर्णयाला कडाडून विरोध होऊ लागला आहे. हिंदी विषयाची सक्ती खपवून घेणार नाही, अशा शब्दात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या निर्णयाला आक्रमकपणे विरोध केला आहे. काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनीही या निर्णयाशी असहमती व्यक्त करत हिंदी सक्ती लादणे म्हणजे मराठीवर अन्याय असल्याची टीका केली आहे. मात्र,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपने पहिलीपासून हिंदी विषय अनिवार्य करण्याच्या भूमिकेचे समर्थन केले आहे. त्यामुळे हिंदी सक्तीवरून भाजप आणि विरोधक यांच्यात संघर्ष उडण्याची चिन्हे आहेत.

### हिंदू आहे पण हिंदी नाही-राज ठाकरे



राज्य सरकारने सन २०२५-२६ या चालू शैक्षणिक वर्षापासून राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार येत्या शैक्षणिक वर्षापासून पहिलीसाठी नवा अभ्यासक्रम असणार आहे. तसेच इंग्रजीबरोबर मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा हा विषय अनिवार्य असणार आहे. या निर्णयावर राज ठाकरे यांनी गुरुवारीपक्षाची भूमिका स्पष्ट केली. सरकारचे सध्या जे सर्वत्र हिंदीकरण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, ते या राज्यात आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. हिंदी ही काही राष्ट्रभाषा नाही. ती देशातील इतर भाषांसारखी एक राज्यभाषा आहे. ती महाराष्ट्रात का म्हणून पहिलीपासून शिकायची? तुमचे त्रिभाषेचं सूत्र जे काही आहे, ते सरकारी व्यवहारांपुरतेच मर्यादित ठेवा, त्याला शिक्षणापर्यंत आणू नका. या देशात भाषावार प्रांतरचना झाली आणि ती इतकी वर्ष टिकली. पण आत्ताच ही दुसऱ्या प्रांताची भाषा इथे महाराष्ट्रावर लादण्याचे प्रकार का सुरु झालेत? भाषावार प्रांतरचनेच्या तत्वालाच हरताळ फासला जात आहे, अशी टीका राज ठाकरे यांनी केली आहे. आम्ही हिंदू आहोत पण हिंदी नाही आहोत. महाराष्ट्रावर हिंदीकरणाचा मुलामा द्यायचा प्रयत्न कराल तर महाराष्ट्रात संघर्ष अटळ आहे. या सगळ्याकडे पाहिले तर लक्षात येते की सरकार हा संघर्ष मुद्दामून घडवत आहे. येणाऱ्या आगामी निवडणुकांमध्ये मराठी विरुद्ध मराठीतर असा संघर्ष घडवून स्वतःचा फायदा पान २ वर

### संपर्कसूत्र तयार करण्यासाठी हिंदी-फडणवीस



नवीन शैक्षणिक धोरण हे आपण यापूर्वीच लागू केले आहे. कोणताही नवीन निर्णय आपण घेतलेला नाही. महाराष्ट्रात प्रत्येकाला मराठी भाषा आली पाहिजे, हा आपला आग्रह आहे. त्यासोबत देशात एक संपर्कसूत्र तयार करण्यासाठी हिंदी ही एक संपर्कसुत्राची भाषा आहे. ही भाषा देखील लोकांनी शिकली पाहिजे असा प्रयत्न आहे. परंतु, कुणालाही इंग्रजी किंवा अन्य भाषा शिकता येईल आणि त्यासाठी कुठलीही मनाई नाही, असा खुलासा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

### आधी अभ्यास करा; मग बोला-आशिष शेलार



शालेय शिक्षणात हिंदीला अनिवार्य भाषा करण्यास विरोध करणाऱ्या राज ठाकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आधी अभ्यास करावा. त्यासाठी त्यांना आम्ही राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रत पाठवू. पूर्ण अभ्यास केल्यानंतरच त्यांनी याबाबत बोलावे, अशी प्रतिक्रिया आशिष शेलार यांनी दिली आहे.

### मराठी भाषिकांच्या अस्मितेवर घाला-विजय वडेट्टीवार



संघराज्य निर्मितीच्या वेळी भाषेला प्राधान्य देताना राज्यांची मातृभाषा मान्य केली गेली. महाराष्ट्राची मातृभाषा मराठी आहे. मराठीसह इंग्रजी या दोन भाषा शिक्षण आणि प्रशासनात वापरल्या जातात. अशा परिस्थितीत तिसरी भाषा म्हणून हिंदी सक्तीने लादणे म्हणजे मराठीवर अन्याय आहे. मराठी भाषिकांच्या अस्मितेवर घाला आहे, अशी टीका विजय वड्डेटीवार यांनी केली आहे. जर तिसरी भाषा हवीच असेल, तर ती पर्यायी असावी. पण ती सक्तीची करणे हा एकप्रकारे केंद्रातून राज्यांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न आहे, जो संघराज्य व्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांना धरून नाही. काही राज्यांनी याला विरोध केला आहे. विरोध करणाऱ्या राज्यांना धमकावले जात असून ही चिंता वाढवणारी बाब आहे. मराठी अस्मिता आणि भाषिक अधिकार रक्षणासाठी ही सक्ती तात्काळ मागे घेतली पाहिजे, अशी मागणी वड्डेटीवार यांनी केली आहे.

## संपादकीय

### वारसा संवर्धनाची गरज

आज जागतिक वारसा दिवस. आपत्ती आणि संघर्षामुळे धोक्यात आलेला वारशाशी संबंधित यावर्षीची संकल्पना आहे. जे गमावणे आपल्याला परवडणार नाही अशा सगळ्या गोष्टी म्हणजे वारसा आणि तो वारसा संवेदनशीलतेने जपण्याचा प्रयत्न सातत्याने करणे म्हणजे संवर्धन अशी वारसा आणि त्याचे संवर्धन याची ढोबळ व्याख्या केली जाऊ शकेल. मानवी हस्तक्षेप, पर्यावरणीय आणि हवामान बदल आणि संघर्ष यामुळे जागतिक पातळीवर अनेक वारसा स्थळे धोक्यात आहेत. उद्ध्वस्त होत आहेत. तथापि भारतात जाणिवेच्या अभावामुळे अनेक शहरांच्या पातळीवरदेखील शहरांचा वारसा धोक्यात आहे. त्या दृष्टिकोनातून नाशिकचा विचार केला तर प्रत्येक नाशिककराचा उर नक्कीच अभिमानाने भरुन येईन इतका संपन्न वारसा नाशिकला लाभला आहे. गोदावरी, तिच्या तीरावर भरणारा कुंभमेळा आणि सह्याद्री ही तर नाशिकची अमीट ओळख. त्याबरोबरीने तिच्या तीरावरचे वाडे, वाड्यांमधील भव्य मंदिरे, तिच्या तीरावर शंभर वर्षे चालणारी व्याख्यानमाला, सह्याद्रीच्या कडेकपारीत राहणारे लोक-त्यांची निसर्गाला पूरक जीवनशैली, तिथले जंगल, तिथली जैविविधता, पुरातन वृक्ष, समृद्ध साहित्य परंपरा, विचारवंत कला, खाद्यसंस्कृती, मंदिरे, सगळ्या प्रकारच्या कला, आयुर्वेदाची परंपरा, गडकिल्ले हे सारे त्या वारशाचाच एक भाग आहेत. बाजारपेठेचे ठिकाण ही नाशिकची गेल्या ३०० वर्षांपासूनची ओळख हादेखील वारसाच आहे. ही ओळख टिकवण्यासाठी आपण दैनंदिन पातळीवर काय करु शकतो याचा विचार लोकांनी करणे आवश्यक आहे. त्यासाठी वारसा-तिथला इतिहास याची तुमच्या आयुष्यात काय भूमिका पान २ वर

## धुळ्यात युवकाची निर्घृण हत्या



**धुळे ।** शहरातील नंदी रोडवरील एनर जिमजवळ वाहनाचा कट लागल्याच्या क्षुल्लक कारणावरून दोन अनोळखी इसमांनी युवकाचे डोके सिमेंट क्राँक्रिट रस्त्यावर आपटून त्याची निर्घृण हत्या केली. ही धक्कादायम काल दि. १६ रोजी रात्री घडली. याप्रकरणी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

फैज अहमद मुराद हुसैन अन्सारी (वय १८, रा. मच्छी बाजार, गल्ली नं.७, निशांत चौक, धुळे) असे मयत तरुणाचे नाव आहे. याबाबत त्याचे नातेवाईक मोहम्मद साजिद अब्दुल लतीफ अन्सारी (वय ३९ रा.गल्ली नं. ७) यांनी चाळीसगाव रोड पोलिसात फिर्याद दिली आहे. त्यानुसार फैज हा काल दि.१६ एप्रिल रोजी रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास एनर जिमजवळून जात होता. त्यादरम्यान समोरून येणाऱ्या वाहनाला कट लागल्याने त्यावरील दोन अनोळखी इसमांशी फैज याचा वादा झाला. यावेळी दोघा अनोळखी आरोपींनी फैज याला पकडून त्याचे डोके ५ ते ६ वेळा सिमेंट क्राँक्रिट रस्त्यावर आपटून गंभीर त्याला जखमी केले. त्यानंतर छातीवर लाथाबुक्यांनी मारहाण करीत त्याचा खून केला. याप्रकरणी दोघा अनोळखी आरोपींविरुद्ध बीएनएस कायदा कलम १०३, ११५, (२) ३५२, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## काँग्रेसचे संग्राम थोपटेंचा भाजपा प्रवेश निश्चित



**पुणे ।** भोरचे माजी आमदार संग्राम थोपटे हे काँग्रेसला सोडचिठ्ठी देणार आहेत. त्यांचा भाजप प्रवेश निश्चित झाला असून रविवारी ते पक्ष प्रवेश करणार असल्याची माहिती आहे. भाजपचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या पुढाकाराने संग्राम थोपटे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती आहे. संग्राम थोपटे हे काँग्रेसचे बडे नेते असून ते तीन वेळा आमदार होते. तर त्यांचे वडील अनंतराव थोपटे हे सहा वेळा भोर विधानसभेचे आमदार होते. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार शंकर मांडेकर यांनी संग्राम थोपटे यांचा पराभव केला होता. संग्राम थोपटे यांनी आता काँग्रेसला रामराम करुन भाजपमध्ये प्रवेश करण्याचे निश्चित केल्याची माहिती आहे. त्यासाठी त्यांनी केंद्रीय मंत्री अमित शाह यांचीही भेट घेतल्याची माहिती आहे.

## आम्ही बाप चोरला नाही, हृदयात पुजला!



एकनाथ शिंदेंची उद्धव ठाकरेंवर टीका

**सातारा ।** माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा काल नाशिकमध्ये कार्यकर्ता मेळावा पार पडला. या मेळाव्यात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, त्यांच्याबरोबर गेलेले आमदार आणि भाजपासह महायुती सरकारवर जोरदार टीका केली. यावेळी ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव न घेता, मला दुसऱ्यांचे वडील चोरायची गरज नाही असे म्हटले होते. यानंतर पत्रकारांशी बोलताना शिवसेनेचे आमदार आदित्य ठाकरे यांनी, सगळ्या पक्षांना आज हिंदूहृदय सम्राटांशिवाय पर्याय नाही. पण, काही चोरही माझ्या आजोबांचा फोटो वापरत आहेत. त्यांना त्यांच्या वडिलांचा फोटो वापरायला लाज वाटते, असे म्हटले होते. आता उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरेंच्या या टीकेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. पत्रकारांशी बोलताना एकनाथ शिंदे यांनी बाळासाहेब ठाकरे यांचे काही जुने व्हिडिओ दाखवत ठाकरेंना लक्ष्य केले. यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले की, कालही बाप चोरला, बाप चोरला हे रडगाणं चालू होतं. आम्ही बाप चोरला नाही. तो कायम हृदयात पुजला आणि यापुढेही पुजत राहू. पान २ वर

## ‘वक्फ’च्या दोन कलमांना तात्पुरती स्थगिती

### सर्वोच्च न्यायालयाने दिले अंतरिम आदेश!

**नवी दिल्ली ।** केंद्र सरकारने नुकत्याच संपलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटी लोकसभा व राज्यसभेत वक्फ विधेयक मंजूर करून घेतले. यानंतर राष्ट्रपतींच्य स्वाक्षरीनंतर त्याचे कायद्यात रुपांतर झाले. पण या विधेयकाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्यानंतर त्यावर सविस्तर सुनावणी सुरू झाली. या सुनावणीदरम्यान आज सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. वक्फ कायद्यातील दोन कलमांच्या अंमलबजावणीवर केंद्र सरकारच्या विनंतीनुसार तात्पुरती स्थगिती आणण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.





आज सर्वोच्च न्यायालयात केंद्र सरकारने न्यायालयाला दोन मुद्द्यांवर आश्वासन दिले आहे. त्यानुसार पुढील सुनावणी होईपर्यंत नव्या कायद्यानुसार बाहेरील सदस्यांची वक्फ बोर्डावर नियुक्ती केली जाणार नाही. त्याशिवाय, वक्फ बोर्डाने एखादी मालमत्ता वक्फ बोर्डाची असल्याचे जाहीर केले असेल, तर त्यात पुढील सुनावणीपर्यंत हस्तक्षेप करणार नाही. या भूमिकेवर सर्वोच्च न्यायालयानं मंजुरी दिली असून येत्या ७ दिवसांत केंद्र सरकारला या मुद्द्यांवर भूमिका सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्यायमूर्ती संजय कुमार व न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर पान २ वर

### फक्त पाच याचिकांवरच सुनावणी

सर्वोच्च न्यायालयात वक्फ कायद्यावर आक्षेप घेणाऱ्या जवळपास १५० हून अधिक याचिका दाखल झाल्या आहेत. याचा उल्लेख करत सर्वोच्च न्यायालयाने यातल्या फक्त पाच याचिकाच प्रातिनिधिक म्हणून स्वीकारल्या जाऊन त्यावरच सुनावणी घेतली जाईल. यासंदर्भात याचिकाकर्त्यांनी सर्व याचिकांमधून पाच याचिका प्रातिनिधिक म्हणून निवडून न्यायालयाला सादर करण्यास सहमती दर्शवली असल्याचेही न्यायालयाने यावेळी नमूद केले. सुनावणीदरम्यान केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाकडे सात दिवसांचा अवधी मागितल्यानंतर न्यायालयाने त्याला मंजुरी दिली आहे.

## ...तर खासदारकीचा राजीनामा जेपीसी अध्यक्षांची घोषणा



वक्फ सुधारणा विधेयकावर काम करणाऱ्या जेपीसीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांचे महत्वाचे वक्तव्य आले आहे. वक्फ सुधारणा कायद्यात एक जरी चूक आढळली तर मी माझ्या खासदारकीचा राजीनामा देईन असे त्यांनी म्हटले आहे. विरोधकांनी याचिकेद्वारे वक्फ कायद्यातील तरतुदींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. याबाबत सरकारचे म्हणणे मांडण्यासाठी सात दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे. पुढील सुनावणी ५ मे रोजी होणार आहे. यावर बोलतांना जगदंबिका पाल म्हणाले की, जेपीसी समितीने देशभरात फिरत पुरावे जमा केले आहे. त्यामुळे यात चुकीचे काम झालेले नाही.

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | 1875 |
| नवती (२) | 1625 |

### मिश्किली





## ईडीच्या विरोधात काँग्रेसचे आंदोलन

**मुंबई ।** केंद्रातील हुकूमशाहीचे मोदी सरकार ईडी, सीबीआयचा गैरवापर करत विरोधी पक्षांना संपवू पहात आहे. त्यांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी गुरुवारी येथे केला. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी यांच्या विरोधात सुरु असलेली ईडीची कारवाई ही राजकीय हेतूने केली आहे. मोदी-शाह अशा कारवाया करून काँग्रेस पक्षाला संपवू शकत नाहीत आणि अशा कारवायांनी काँग्रेसचे मनोधैर्य तसूभरही खचणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी ईडीने सोनिया गांधी, राहुल गांधी यांच्या विरोधात आरोपपत्र दाखल केले आहे. याचा निषेध म्हणून आज चेन्नीथला यांच्या उपस्थितीत दादर येथील इंडिया बुल्स जवळ आंदोलन करण्यात आले. या आंदोलनानंतर प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना चेन्नीथला म्हणाले, मोदी सरकारने सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्यावर केलेल्या कारवाईचा आम्ही निषेध करतो, असे ते म्हणाले.

## महेश मांजरेकर यांना जीवन गौरव पुरस्कार

### भीमराव पांचाळ, अनुपम खेर, काजोल, मुक्ता बर्वेंचा सन्मान



**मुंबई ।** चित्रपट क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल दिला जाणारा चित्रपती व्ही.शांताराम जीवन गौरव पुरस्कार नामवंत अभिनेता, दिग्दर्शक आणि निर्माते महेश मांजरेकर यांना जाहीर झाला आहे. तर यंदाचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार मराठीतील ज्येष्ठ गझलगायक भीमराव पांचाळे यांना घोषित करण्यात आला आहे. प्रत्येकी १० लाख रोख रक्कम, स्मृतीचिन्ह आणि मानपत्र असे दोन्ही पुरस्कारांचे स्वरूप आहे. येत्या २५ एप्रिल रोजी एनएससीआय डोम, वरळी, मुंबई येथे एका भव्य समारंभात या पुरस्कारांचे वितरण केले जाईल. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी गुरुवारी महाराष्ट्र सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे दिल्या जाणाऱ्या चित्रपती व्ही.शांताराम जीवन गौरव पुरस्कार, चित्रपती व्ही.शांताराम विशेष योगदान पुरस्कार, स्व.राज कपूर जीवन गौरव पुरस्कार, स्व.राज कपूर विशेष योगदान पुरस्कार तसेच गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार अशा पाच महत्त्वाच्या पुरस्कारांची घोषणा केली. त्यानुसार हिंदी चित्रपट क्षेत्राच्या उत्कर्षासाठी दीर्घकाळ आपले आयुष्य व्यतीत करणारे ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांना हिंदी चित्रपट सृष्टीतील मानाचा समजला जाणारा स्व.राज कपूर जीवन गौरव पुरस्कार घोषित झाला आहे. तर स्व.राज कपूर विशेष योगदान पुरस्कार अष्टपैलू अभिनेत्री काजोल देवगण यांना जाहीर झाला आहे. या दोन्ही पुरस्कारांचे स्वरूप अनुक्रमे १० लाख आणि ६ लाख रुपये, स्मृतिचिन्ह तसेच मानपत्र, चांदीचे पदक असे आहे. चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार यंदा प्रसिद्ध अभिनेत्री मुक्ता बर्वे यांना प्रदान करण्यात येणार असून सहा लाख रुपये रोख, स्मृतीचिन्ह, मानपत्र आणि चांदीचे पदक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्कार्थींची निवड करण्यासाठी राज्य सरकारच्या स्तरावर समिती नेमण्यात आली होती. या समितीत पं ब्रिजनारायण, अशोक पत्की. सत्यशील देशपांडे, पं उल्हास कशाळकर आणि अंबरीश मिश्र आदींचा समावेश होता.

## कृषिमंत्री कोकाटेंना मुख्यमंत्र्यांचा चाप

**मुंबई ।** कृषी खात्यातील अधिकाऱ्यांच्या मध्यावधी बदल्या तसेच कृषी संचालकांच्या नियतकालिक बदल्यांचे अधिकार स्वतःकडे घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना चाप लावला आहे. याशिवाय सामान्य राज्य सेवा गट अ आणि ब, महाराष्ट्र कृषी सेवा गट अ आणि ब (कृषी उपसंचालक, तालुका कृषी अधिकारी), सामान्य राज्य सेवा गट अ आणि ब आदी संवर्गातील नियतकालिक बदल्यांचे अधिकार कृषी आयुक्तांना देण्यात आले आहेत. कृषी विभागाने गुरुवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला. या निर्णयाच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांनी कोकाटे यांच्या बदल्यांचे अधिकार मर्यादित केले आहेत. वादग्रस्त विधाने करून नव्यानव्या वादाला निमंत्रण देणारे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना अलीकडेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समज दिली होती. आता देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने कृषी विभागाने खात्यातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबतचे धोरण स्पष्ट केले आहे.